Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28th Rank

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ५३ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

शुक्रवार, दि. २४ फेब्रुवारी, २०१७




# प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे

कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## यांनी सादर केलेला अहवाल

# शिवाजी विद्यापीठ : जलसंधारण



Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28th Rank

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

५३ वा वार्षिक पदवी प्रदान समारंभ
शुक्रवार, दि.२४/०२/२०१७

## मा. प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे,

कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
यांनी सादर केलेला अहवाल

शिवाजी विद्यापीठाचा ५३ वा दीक्षान्त समारंभ आज संपन्न होत आहे. या ऐतिहासिक समारंभाचे प्रमुख पाहुणे, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, उपस्थित मान्यवर, खासदार, आमदार, महापौर, नगरसेवक, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, नूतन पदवीधर, विद्यार्थी व विद्यार्थिनी, पालक, माध्यम प्रतिनिधी आणि मित्र हो, आजच्या दीक्षान्त सोहळ्यामध्ये मी आपणा सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करतो. सुरवातीलाच या दीक्षान्त समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रांची संख्या ही ४९,९५१ इतकी असल्याचे सांगताना मला आनंद होतो आहे.

मित्र हो, नुकतीच आपण शिवजयंती साजरी केली. शिवाजी विद्यापीठ हे छत्रपती शिवाजी महाराज या थोर युगकर्त्याच्या नावाने सुरु झालेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाला थोर समाजसुधारक व स्त्री शिक्षणाचे प्रणेते महात्मा फुले, सामाजिक न्याय प्रत्यक्ष अंमलात आणणारे राजर्षि छत्रपती शाहू महाराज आणि भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर या सर्वांच्या विचारांचा वारसा लाभला आहे. छत्रपती राजाराम महाराज आणि डॉ. बाळकृष्ण यांचे कोल्हापुरात विद्यापीठ व्हावे, असे स्वप्न होते. हे स्वप्न साकार करण्यासाठी कै. मा. यशवंतराव चव्हाण व लोकनेते बाळासाहेब देसाई, डॉ. सी. रा. तावडे आणि या परिसरातील अनेक मान्यवरांनी प्रयत्न केले. विद्यापीठ स्थापनेनंतर प्रथम कुलगुरु मा. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी या विद्यापीठाच्या उभारणीत अथक परिश्रम घेतले, याची विनम्र आठवण मला होते आहे. या सर्वांच्या पवित्र स्मृतींना मी मनापासून अभिवादन करतो.

सुवर्णमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी स्थापन झाले. सन २०१४-१५ मध्ये या विद्यापीठाने सर्वाधिक सीजीपीए गुणांकनासह नॅकची 'अ' श्रेणी प्राप्त करून राज्यातील अग्रमानांकित विद्यापीठ बनण्याचा बहुमान पटकाविलेला होता. त्यानंतर गेल्या वर्षभरामध्ये विद्यापीठाच्या शिरपेचात अनेक मानाचे तुरे खोवले गेले आहेत, याचा मी अभिमानपूर्वक उल्लेख करतो. भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे गतवर्षी प्रथमच देशातील विद्यापीठांची क्रमवारी ठरविण्यासाठी नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) हा उपक्रम हाती घेण्यात आला. या क्रमवारीत देशातील सुमारे ५५० विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठाने २८ वा, तर राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

काही दिवसांपूर्वीच विद्यापीठाच्या लौकिक वृद्धिंगत करणाऱ्या एका महत्त्वपूर्ण सर्वेक्षणाचा निकाल हाती आला. तो म्हणजे यू.एस.न्यूज अॅन्ड वर्ल्ड रिपोर्ट या अमेरिकेतील प्रतिष्ठित संस्थेने भारतातील बेस्ट ग्लोबल युनिव्हर्सिटीजची यादी जाहीर केली. यामध्ये शिवाजी विद्यापीठ २१ व्या स्थानी झळकले आहे. जगभरातील ज्या विद्यार्थ्यांना भारतातील विद्यापीठांत प्रवेश घ्यावयाचा आहे, त्यांच्यासाठी ही यादी जाहीर केली जाते. संबंधित विद्यापीठाचे सर्व विषयांतील योगदान व त्याचे जगभरातील शैक्षणिक समुदायाकडून झालेले मूल्यमापन यांवर ही यादी आधारित असते. या गोष्टीसाठी माझ्या विद्यापीठातील शिक्षक, विद्यार्थ्यांसह सर्वच संबंधित घटक अभिनंदनास पात्र आहेत.

करन्ट सायन्स या अग्रमानांकित जर्नलने स्कोपस आकडेवारीच्या आधारावर केलेल्या सर्वेक्षणात संशोधनाच्या बाबतीत शिवाजी विद्यापीठाचा देशात १९ वा क्रमांक लागतो. देशातील अकृषी विद्यापीठांमध्ये ६ वा, तर महाराष्ट्रात प्रथम क्रमांक लागतो. मटेरियल सायन्सच्या संशोधनात देशातील अकृषी विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठ हे देशात प्रथम क्रमांकावर असून या यादीत स्थान मिळविणारे राज्यातील एकमेव विद्यापीठ आहे. याचे श्रेय पदार्थविज्ञान, नॅनो सायन्स, रसायनशास्त्र व इतर विज्ञानशाखांतील संशोधकांना जाते.

जगातील अग्रगण्य अशा नेचर संशोधन पत्रिकेच्या सर्वेक्षणानुसार, ऑनलाइन संदर्भांचा व्यापक वापर करणाऱ्या विद्यापीठांच्या यादीत शिवाजी विद्यापीठ देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. म्हणजे, आमचे विद्यार्थी आता ग्रामीणतेचा शिक्का पुसून ग्लोबल होण्याकडे वाटचाल करीत आहेत, हेच यातून अधोरेखित होते.

मला प्रमुख पाहुण्यांना सांगावयास आनंद होतो की, शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोल्हापूर, सातारा, आणि सांगली या तीन जिल्ह्यांमध्ये विस्तारले असून संलग्नित महाविद्यालयांची संख्या २८३ आहे. शिवाय १३ संशोधन संस्था विद्यापीठाशी संलग्नित आहेत. विद्यापीठात ३९ पदव्युत्तर अधिविभाग, दहा अध्यासने आहेत. सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांना आठ विविध विद्याशाखांतून पदवी आणि पदव्युत्तर उच्च शिक्षण आणि संशोधन स्तरावरील शिक्षण दिले जाते. याबरोबरच काम करुन शिकणारे, शिक्षणाच्या नियमित प्रवाहात काही कारणाने येऊ न शकणारे असे सुमारे ४० हजार विद्यार्थी दूरशिक्षण घेत आहेत.

महत्वाचे म्हणजे विद्यापीठाप्रमाणेच परिक्षेत्रातील २५ महाविद्यालयांना 'नॅक'चे 'अ' आणि तीन महाविद्यालयांना 'अ+' मानांकन प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे चार महाविद्यालयांना 'कॉलेज विथ पोटॅन्शियल फॉर एक्सलन्स' दर्जा मिळाला आहे. तसेच, सहा संलग्नित महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा मिळाला आहे.

विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राचा विद्यार्थी अमोघ थोरात युपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाला असून जस्मीन शेख व संजय लट्ठे हे आमचे विद्यार्थी जर्मनी येथे झालेल्या नोबेल लॉरेट मिटींगला उपस्थित राहण्यास निवडले गेले होते.

विद्यापीठाच्या विकासासाठी, संशोधन कार्यात विविध अधिविभागातील प्राध्यापक सतत प्रयत्नशील असल्याने संशोधन व विकासासाठी भारतातील बहुतेक सर्व शिखर संस्थांकडून विद्यापीठास या वर्षात भरघोस निधी प्राप्त झाला आहे. राष्ट्रीय स्तरावरील संशोधन पातळीवर भारतातील विद्यापीठांचे जे मूल्यांकन झाले, त्यामध्ये आपल्या विद्यापीठाचा 'एच' इंडेक्स ७० इतका असून त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचे मानांकन देशात उंचावले आहे.

विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी विभागाने देशातील टॉप टेन बीटी स्कूलमध्ये आठवे स्थान मिळविले आहे. त्याचप्रमाणे जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील विद्यापीठाच्या समाजाभिमुख संशोधनाची दखल थेट केंद्रीय जैवतंत्रज्ञान विभागाने घेऊन हे संशोधन विभागाच्या वेबसाईटवर प्रदर्शित केले आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. भौतिकशास्त्र विभागाने सौरउर्जेमध्ये भरीव संशोधन केले आहे आणि त्यामुळे देशातील सौरउर्जेमध्ये संशोधन करणाऱ्या विभागांमध्ये आपल्या या विभागाचा देशात चौथा क्रमांक आहे, ही आपणा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.

शिवाजी विद्यापीठाचे पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्र गतवर्षीपासून कार्यान्वित झाले असून भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात इस्रोच्या I.R.N.S.S. या उपग्रह उपक्रमांतर्गत एक रिसिव्हर आपल्या केंद्रात प्रस्थापित करण्यात आला असून तो उच्च क्षमतेने कार्यान्वित झाला आहे. यामुळे महत्त्वाकांक्षी भारतीय जीपीएस प्रणालीच्या नकाशावर शिवाजी विद्यापीठाचे नाव झळकले आहे. हा बहुमान मिळविणारे शिवाजी विद्यापीठ हे एकमेव विद्यापीठ आहे.

शिवाजी विद्यापीठात सुमारे ३४ एकर जागेवर देशातील पहिल्या लीड बॉटॅनिकल गार्डनचे उद्घाटन केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. येथे देशभरातील ११०० हून अधिक दुर्मिळ वनस्पतींच्या प्रजातींचे जतन व संवर्धन करण्यात येत आहे.

शिवाजी विद्यापीठाचे देशातील पहिले वस्त्रोद्योग इनक्युबेशन सेंटर इचलकरंजीच्या डी.के.टी.ई. अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यान्वित झाले आहे.

गतवर्षी घोषित केल्याप्रमाणे संशोधक शिक्षक, विद्यार्थी यांना प्रोत्साहन देण्यासाठी रिसर्च सेन्सिटायझेशन ग्रँट, रिसर्च स्टुडंट्स फायनान्शियल असिस्टन्स या संशोधन वृत्तींसाठी विद्यापीठाने नियमावली व भरीव आर्थिक तरतूद अर्थसंकल्पामध्ये केली आहे. त्याचा विद्यापीठातील संशोधकांना मोठा लाभ होणार आहे. या वर्षीपासून 'बेस्ट रिसर्चर अॅवॉर्ड' ही प्रदान करण्यात येणार आहेत.

संशोधन वाढीस लागण्यासाठी आणि संशोधनाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठाने गेल्या वर्षभरात सी-डॅक, धातू तंत्र प्रबोधिनी, बायरॅक, इंडोजर्मन टूल रुम आदी राष्ट्रीय संस्थांबरोबरच द.कोरिया, इस्राईल, यु.के. अशा प्रगत देशांतील नामवंत विद्यापीठांशी सामंजस्य करार केले आहेत. आजपर्यंत विद्यापीठाने एकूण ४३ राष्ट्रीय, तर २१ आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार केले आहेत.

याठिकाणी मला सांगण्यास आनंद होतो आहे की, गेल्या नोव्हेंबरमध्ये नवी दिल्ली येथे 'फिक्की'तर्फे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मेळा आयोजित करण्यात आला होता. जगभरातील महत्त्वाच्या शैक्षणिक संस्था, विद्यापीठे त्यात सहभागी झाली होती. यामध्ये देशातून सहभागी होणारे शिवाजी

विद्यापीठ एकमेव राज्य विद्यापीठ होते. या मेळ्यातील सहभागाचे फलित म्हणून इस्राईल येथील एरियल विद्यापीठासमवेत इस्राईलचे राष्ट्राध्यक्ष श्री. रिव्हेन रिव्हलिन यांच्या प्रमुख उपस्थितीत नवी दिल्ली येथे सामंजस्य करार करण्याची संधी शिवाजी विद्यापीठास लाभली.

इन्फोसिस समवेत झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत इन्फोसिसच्या बेंगलोर येथील मुख्यालयात विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकांच्या पहिल्या बॅचला प्रशिक्षण देण्यात आले आहे. यापुढेही हा उपक्रम सुरू राहणार आहे.

मला याठिकाणी आपणा सर्वांना एक गोष्ट सांगताना विशेष आनंद होतो आहे की, केंद्र सरकारतर्फे घोषित करण्यात आलेल्या यग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ केडेमिक नेटवर्क्सफ (GIAN-ग्यान) या योजनेअंतर्गत सलग सहा कोर्सेस घेणारे शिवाजी विद्यापीठ हे एकमेव विद्यापीठ ठरले आहे. या प्रकल्पाअंतर्गत अमेरिका, दक्षिण कोरिया, थायलंड, इटली आणि फ्रान्स या देशांतील विविध विषयांतील तज्ज्ञांनी आपल्या विद्यापीठात येऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. या प्रकल्पातून साहजिकच विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक बंध दृढ होण्यास मदत होते आहे. आमचे विद्यापीठ आता जागतिक स्तरावर पोहोचत आहे, याचेच हे लक्षण आहे.

भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाकडून विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाला 'सेंटर फॉर एज्युकेशन, लर्निंग अॅन्ड रिसर्च ट्रेनिंग इन अँजिओस्पर्म टेक्सॉनॉमी' मंजूर झाले आहे, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

विज्ञान अधिविभागांबरोबरच सामाजिक शास्त्रे व भाषा विषयांची कामगिरीही स्तुत्य स्वरुपाची आहे. हिंदी विषयात कौशल्याधारित अभ्यासक्रम सुरू करणारे आपले पहिले विद्यापीठ आहे. 'युनिसेफ'ने राज्यातील विद्यापीठांच्या वित्त व लेखा कार्यपद्धतीचा सहा महिन्यांहून अधिक काळ अभ्यास करून एकमेव शिवाजी विद्यापीठास अनुदानास पात्र ठरविले आणि 'युनिसेफ पार्टनरशीप विथ शिवाजी युनिव्हर्सिटी फॉर मीडिया अॅन्ड कम्युनिकेशन अॅक्टिव्हिटीज' या उपक्रमासाठी विद्यापीठास निधीही जाहीर केला आहे.

याखेरीज, शिवाजी विद्यापीठ अंध विद्यार्थ्यांसाठी करीत असलेल्या शैक्षणिक कार्याची दखल नॅशनल ब्लाईंड असोसिएशनने घेतली असून या क्षेत्रात काम करणारे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे विद्यापीठ म्हणून गौरविले आहे. विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे इन्फ्लिबनेट सेंटर ई-रिसोर्सेसच्या वापरात देशात २१ व्या क्रमांकावर असल्याचा अहवाल आहे.

याखेरीज, विद्यापीठाच्या कुलगुरूंची राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगासह शासनाच्या विविध समित्यांवर करण्यात आलेली नियुक्ती आणि राज्य शासनाच्या सुमारे १७०० हून अधिक योजनांसाठी नियुक्त करावयाच्या तज्ज्ञांच्या नामिका सूचीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या तज्ज्ञांचा समावेश या बाबी सुद्धा नोंद घेण्यासारख्या आहेत.

विद्यापीठाच्या कुलगुरूंनी गेल्या १६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत इंग्लंड येथील ऑक्सफर्ड विद्यापीठास व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून भेट दिली. पदारुढ कुलगुरूंनी ऑक्सफर्ड विद्यापीठात संशोधक म्हणून उपस्थित राहण्याचा हा दुर्मिळ प्रसंग होता, हे आपणा सर्वांना सांगताना मला अत्यंत आनंद होत आहे.

गतवर्षी मी आपणास राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अर्थात 'रुसा' या केंद्र सरकारच्या उपक्रमात समरसून सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार, आपण सर्वांनी एकत्रितपणे केलेल्या

प्रयत्नांचा परिपाक म्हणून शिवाजी विद्यापीठास सुमारे  कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. विद्यापीठास 'RUSA Centre for Natural Products & Alternative Medicines' मंजूर झाले आहे. त्याचप्रमाणे 'Stop diabetics-Development of Nutraceutical products' हा प्रकल्पही मंजूर झाला आहे.

'रुसा' अंतर्गत इक्विटी इनिशिएटीव्ह शीर्षकांतर्गत 'Resource Centre for Inclusive Eduaction' च्या प्रस्थापनेस मंजुरी मिळाली असून त्यासाठी निधीही आदा करण्यात आला आहे. रुसाअंतर्गत विद्यापीठास भरीव आणि महत्त्वाचे असे स्टार्ट-अप प्रकल्पही मंजूर झाले आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघटनेच्या नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाली असून या वर्षीपासून ती अधिक जोमाने कार्यान्वित होईल, हे घोषित करीत असताना या प्रसंगी मला अत्यंत आनंद होतो आहे.

दि. १० ते १४ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत शिवाजी विद्यापीठाने ३२ व्या अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाचे यजमानपद भूषविले. देशभरातील ७९ विद्यापीठांचे सुमारे १५०० विद्यार्थी-विद्यार्थिनी, संघ व्यवस्थापक या कालावधीत विद्यापीठात आले होते. सुमारे २६ कलाप्रकारांचे दमदार सादरीकरण या निमित्ताने कोल्हापूरकरांना पाहावयास मिळाले. या महोत्सवाचे यशस्वी नियोजन विद्यापीठाने केले. देशभरातील सहभागींनी विद्यापीठासह कोल्हापूरच्या आदरातिथ्याबद्दल गौरवोद्‌गार काढले, हे सांगताना मला अभिमान वाटत आहे.

विद्यापीठाच्या कॅम्पसवर अत्याधुनिक स्वरुपाची व्हर्च्युअल क्लासरुम निर्माण करण्यात आली असून या क्लासरुमचे उद्‌घाटन राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तसेच कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते विद्यापीठाचे म्युझियम कॉम्प्लेक्स व वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या इमारतीचे भूमीपूजनही करण्यात आले.

मेटॅलर्जी या विषयामध्ये बी. एस्सी. हा एक अभिनव अभ्यासक्रम विद्यापीठाने ए.आय.सी.टी.ई. च्या मान्यतेने यंदापासून सुरू केला असून शासकीय तंत्रनिकेतनमध्ये देशातील पहिला पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचा पहिला मान शिवाजी विद्यापीठाला लाभला आहे. त्याचप्रमाणे मिरज येथे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पहिले ऊर्दू महाविद्यालयही या वर्षीपासून आपण सुरू केले आहे. यामुळे ऊर्दू भाषेतून शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या उच्चशिक्षणाची मोठी सोय झाली आहे.

'कमवा व शिका' योजना ही विद्यापीठाची विद्यार्थ्यांप्रती बांधिलकी स्पष्ट करणारी योजना आहे. या योजनेमध्ये विद्यार्थिनींनाही आपण मोठ्या प्रमाणात सामावून घेतले आहे. या मुलींसाठीच्या वसतिगृहाचे भूमीपूजन जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पुढील वर्षी ते विद्यार्थिनींसाठी उपलब्ध असेल, याची ग्वाही मी या प्रसंगी देऊ इच्छितो.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त एका अत्यंत अभिनव उपक्रमाचे विद्यापीठाने आयोजन केले. विद्यापीठासह संलग्नित १२५ महाविद्यालयांमध्ये एकाच दिवशी, एकाच वेळी आपण बाबासाहेबांविषयी १२५ व्याख्यानांचे आयोजन केले. या उपक्रमातील भाषणांचा संग्रह पुस्तक रुपात प्रकाशित करण्यात येत आहे.

गतवर्षी पहिला 'प्राचार्य रा.कृ. कणबरकर पुरस्कार' प्रख्यात शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव यांना प्रदान करण्यात आला.

विद्यापीठ मोबाईल ॲप, पेमेंट गेटवे व एम्प्लॉईज कॉर्नर या सुविधाही कार्यान्वित करण्यात आल्या. या वर्षी दीक्षान्त समारंभासाठीचे शुल्क आपण पेमेंट गेटवेच्या माध्यमातून स्वीकारले. या उपक्रमाची यशस्विता पाहता तसेच केंद्र सरकारच्या कॅशलेस इकॉनॉमीला प्रोत्साहन देण्याच्या उपक्रमाला प्रतिसाद म्हणून टप्प्याटप्प्याने सर्वच प्रकारचे शुल्क ऑनलाइन माध्यमातून आकारण्याचे विद्यापीठाने ठरविले आहे. त्याला आपणा सर्वांचा सकारात्मक प्रतिसाद लाभेल, असा मला विश्वास आहे.

या वर्षी दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राबविलेल्या 'जलयुक्त विद्यापीठ' उपक्रमांतर्गत विद्यापीठ परिसरात जलसंधारणाची अनेक महत्त्वाची कामे करण्यात आली. यामध्ये उपलब्ध जलस्रोतांचे जल-व्यवस्थापन करण्याबरोबरच नवीन शेततळ्यांची निर्मिती तसेच उपलब्ध विहीरींचे पुनरुज्जीवन करण्यात आले. अडीच किलोमीटर लांबीच्या चरींच्या माध्यमातून या पावसाळ्यात विद्यापीठ कॅम्पसवर पडणारा पाण्याचा थेंब अन् थेंब साठविण्यात आला. यामधून कॅम्पसवर सुमारे तीस कोटी लीटर पाणी आपण साठवू शकलो आणि पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ शकलो. यातून दरमहा सहा लाख रुपयांची बचत आपण करू शकलो आहोत, हे मी अभिमानाने नमूद करू इच्छितो. विद्यापीठ कॅम्पसवरील प्रत्येक व्यक्तीचा शुद्ध पाणी पिण्याचा हक्क लक्षात घेऊन विद्यापीठाने जलशुद्धीकरणासाठी नवा आर. ओ. प्रकल्प कार्यान्वित केला आहे. विद्यापीठाला तेथूनच पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो आहे.

सामाजिक जबाबदारीच्या भावनेतूनच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दुष्काळी भागात जलसंधारण कामकाज, दुष्काळी भागासाठी 'एक विद्यार्थी, एक पेंडी' या उपक्रमांबरोबरच यंदा विद्यापीठाने सांगली, सातारा जिल्ह्यांतील दुष्काळी गावांमध्ये नागरिकांना मोफत धान्य व जनावरांसाठी चाऱ्याचे वाटप केले.

महाराष्ट्र शासनाने यंदा दि. १ जुलै, २०१६ रोजी एक कोटी वृक्षलागवडीचा उपक्रम घोषित केला होता. त्यानुसार कोल्हापूर जिल्ह्याचा मध्यवर्ती कार्यक्रम शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात घेण्यात आला. शासनाचा वन विभाग, कृषी विभाग, श्री सिद्धगिरी मठ, कणेरी व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ परिसरात या उपक्रमांतर्गत सुमारे दहा हजार रोपांची लागवड करण्यात आली. ही वृक्ष लागवड व संवर्धनाची प्रक्रिया अविरतपणे सुरू आहे.

पारंपरिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये प्रदान करण्यासाठी विद्यापीठात 'सेंटर फॉर स्कील अ‍ॅन्ड आंत्रप्रिन्युअरशिप डेव्हलपमेंट'ची स्थापना करण्यात आली आहे. याअंतर्गत विद्यापीठ कॅम्पसवर २५३ तर सी.ओ.सी. च्या माध्यमातून ४३ कौशल्य अभ्यासक्रम राबविण्यात आले. याचा सुमारे १२ हजार विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या स्कील फेअरमध्ये ११ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी विविध ८५ कौशल्यांचे प्रशिक्षण घेतले. केवळ विद्यापीठातीलच नव्हे, तर अगदी पदवीपूर्व शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही कॅम्पसवर जॉब फेअरचेही आयोजन करण्यात आले. यामध्ये सहभागी झालेल्या नऊ हजार विद्यार्थ्यांपैकी अकराशे विद्यार्थ्यांना रोजगार संधी उपलब्ध झाल्या. 'डिजीटल इंडिया' उपक्रमाच्या गावोगावी प्रसारासाठी १७०० ट्रेनर्सची टीम विद्यापीठाने प्रशिक्षित केली आहे.

मा. कुलपती महोदयांच्या निर्देशानुसार विद्यापीठाने रंकाळा तलावासह शहर स्वच्छतेचा निर्धार विद्यापीठाने केलेला आहे. या मोहिमेला स्थानिक प्रशासनासह महाविद्यालयांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभतो आहे, ही अभिमानाची बाब आहे. यंदाही विद्यापीठाने महालक्ष्मी मंदिर, बसस्थानक

परिसर आणि रेल्वे स्टेशन या परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. विद्यापीठाकडून एन.एस.एस.च्या माध्यमातून स्वच्छता मोहीम चळवळ म्हणूनच वेळोवेळी राबविण्यात येत आहेत. विद्यापीठात गतवर्षीपासून प्लास्टीकमुक्त परिसर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्याचा परिणाम म्हणून यंदा २ ऑक्टोबर रोजी राबविलेल्या स्वच्छता मोहिमेत कॅम्पसवरील प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण अत्यल्प दिसले.

सन २०१५ च्या पहिल्या आंतरराष्ट्रीय योग दिनापासून विद्यापीठाच्या कॅम्पसवर दैनंदिन योग शिबीर आयोजित करण्यात येत आहे. दररोज सुमारे ३०० साधक या शिबिराचा लाभ घेत आहेत. यंदाच्या राष्ट्रीय योग दिनामध्येही सुमारे ३००० साधकांनी सहभाग घेऊन हा उपक्रम मोठ्या प्रमाणात यशस्वी केला. यापुढील काळातही तो निरंतर सुरू राखण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत अवयवदान मोहीम, निर्भया अभियान राबविण्यात येत आहेच; त्याचबरोबर 'बेटी बचाओ' अभियानासाठीही विद्यापीठाने अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली असून या उपक्रमासाठी ब्रँड ॲम्बेसॅडर म्हणून राष्ट्रकुल स्पर्धेत आपल्या 'सुवर्ण' कामगिरीने ठसा उमटविणारी कुस्तीपटू रेश्मा माने हिची निवड करण्यात आल्याचे सांगताना मला अतीव आनंद होतो आहे. या अंतर्गत विद्यापीठ कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात जनजागृती घडविण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. त्याला आपणा सर्वांची मनापासून साथ लाभेल, अशी अपेक्षा आहे.

परीक्षा विभागाने विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून, परीक्षा फॉर्म भरण्यापासून ते निकाल लागेपर्यंत तसेच निकालानंतरचे पुनर्मूल्यांकन या सर्व कामात आय.सी.टी.चा वापर सुरू केला आहे, हे आपणास विदित आहेच. शिवाजी विद्यापीठाने केंद्रीय मंत्रालयाने नेमून दिलेल्या National Depository कंपनीशी सामंजस्य करार केला आहे. केंद्र सरकारच्या 'डिजीटल इंडिया' उपक्रमांतर्गत देशातील सर्व विद्यार्थ्यांची अंतिम गुणपत्रके, दीक्षान्त प्रमाणपत्रे इत्यादी माहिती आधार कार्ड क्रमांकाशी संलग्नित करून राष्ट्रीय डाटाबेसमध्ये ठेवली जाईल. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार सदर माहिती त्यांच्या पुढील शिक्षणासाठी, नोकरीसाठी व प्रमाणपत्रे तपासणीसाठी डिजीटल माध्यमातून वापरता येऊ शकतील. यानुसार कंपनीच्या प्रणालीमध्ये विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा डाटा डिजीटल स्वरुपात अपलोड करण्यात येईल. प्राथमिक टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना डिजीटल पदवी प्रमाणपत्रे देण्याचा उपक्रम राबविण्यात येईल. त्यानंतर टप्प्याटप्प्याने सर्व स्नातकांपर्यंत याची व्याप्ती वाढविण्यात येईल. यामुळे कागदावरील खर्च वाचेलच, शिवाय विद्यार्थ्यांना त्यांची अधिकृत प्रमाणपत्रे जगाच्या पाठीवर कोठूनही मिळविता येऊ शकतील. ही 'वन स्टॉप ॲकेडेमिक डिपॉझिटरी'ची सुविधा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने खूप महत्त्वाची ठरणार आहे. अशा प्रकारचा सामंजस्य करार करणारे शिवाजी विद्यापीठ देशातील अवघे १७ वे विद्यापीठ ठरले आहे. स्नातकांच्या सोयीसाठी शिवाजी विद्यापीठाने डिजिटायझेशनच्या दिशेने उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

मित्र हो, शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दीक्षान्त सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. अनिल काकडेकर उपस्थित आहेत. डॉ. काकोडकर यांचा आपणास परिचय करून देताना मला अत्यंत आनंद होतो आहे.

बदलत्या भारताची वेगाने वाढणारी ऊर्जेची गरज अणुशक्तीच पुरी करू शकेल, असा दृढ विश्वास असणारे डॉ. काकोडकर हे भारताच्या अणुकार्यक्रमाचे आघाडीचे शिलेदार आहेत. भारताच्या अणुशक्ती आयोगाचे ते दहा वर्षांहून अधिक काळ अध्यक्ष होते. आजही दिवसातील बारा बारा तास ते भारताच्या अणुऊर्जाविषयक समस्यांची उकल करण्यात मग्न असतात.

मध्य प्रदेशातील बडवाणी येथे त्यांचा जन्म झाला. तेथे शालान्त परीक्षा देऊन ते मुंबईच्या व्हीजेटीआयमधून बी.ई. झाले. सन १९६४ मध्ये ते भाभा अणुशक्ती केंद्रात रुजू झाले. सन १९९६ मध्ये ते या केंद्राचे संचालक झाले. सन २०००–२००९ या कालावधीत ते भारताच्या अणुऊर्जा आयोगाचे चेअरमन आणि भारत सरकारच्या अणुऊर्जा विभागाचे सचिव होते. डॉ. काकोडकर यांनी आपली संपूर्ण कारकीर्द भारताच्या अणूऊर्जा कार्यक्रमाच्या विकासासाठी वेचली आहे. भारताच्या 'ध्रुव' या अणुभट्टीची संकल्पना, संरचना, उभारणी आणि नंतर दुरूस्ती यांवरही त्यांनी काम केले आहे. पोखरण येथे सन १९७४ आणि १९९८ मध्ये भारताने ज्या अणुचाचण्या केल्या, त्यामध्ये त्यांनी कळीची भूमिका बजावली.

अणुऊर्जेप्रमाणेच त्यांनी जैवऊर्जा, जैवइंधन यासाठीची संयंत्रे, पायलट प्रकल्प बनवून त्यांचा उपयोग करून पाहिला. त्यातून देशाला ऊर्जाही मिळाली आणि प्रदूषणालाही आळा बसला. अभ्यास, कल्पकता, कष्ट, नवनिर्मितीची आस आणि कुशलतेचे भरभक्कम अधिष्ठान लाभल्यामुळे डॉ. काकोडकर यांना नवभारत घडविण्यासाठी ऊर्जा मिळत गेल्याचे दिसते. भावी काळात अणुऊर्जा केवळ भारतालाच नव्हे, तर जगालाही तारून नेणारी आहे. तथापि, या बाबतीत लोकांच्या मनात भय, शंका व अनभिज्ञता आहे. हे जाणून डॉ. काकोडकर यांनी या संदर्भातील लोकसंभ्रम दूर करण्यासाठी अत्यंत संयमितपणे ते काम करीत आहेत.

भारतातील सर्व आयआयटी संस्थांना जागतिक दर्जाच्या बनविण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीचे ते अध्यक्ष होते. या व्यतिरिक्त सोलर एनर्जी कॉर्पोरेशन, आयुका, इंटर–युनिव्हर्सिटी एक्सिलरेटर सेंटर, नवी दिल्ली आदी संस्थांचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे.

डॉ. काकोडकर यांना देशातील सुमारे २३ शिक्षण संस्थांनी डी.एस्सी., डी.लिट. पदव्या देऊन सन्मानित केले आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या डी.लिट. चाही समावेश आहे. रॉकवेल मेडल, यु.एस.आय.बी.सी. पुरस्कार, फ्रेंच रिपब्लिक अध्यक्षांचा विशेष पुरस्कार, अमेरिकन न्यूक्लिअर सोसायटीचा प्रेसिडेंन्शियल पुरस्कार आदींसह देश–विदेशांतील वैज्ञानिक व शैक्षणिक क्षेत्रांतील अनेक मानसन्मान त्यांनी प्राप्त केले आहेत. डॉ. अनिल काकोडकर यांना भारत सरकारने पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या तीनही महत्त्वाच्या नागरी पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.

मित्र हो, आपण सर्वजण पदवीधर, पदव्युत्तर आणि संशोधनातील पदवी घेऊन एका नव्या जगात, नव्या युगात प्रवेश करणार आहात. हे नवे जग वेगवान आणि स्पर्धेचे आहे. ही स्पर्धा जागतिक स्तरावरची आहे. त्यासाठी तुम्हाला या पदवीबरोबरच काही महत्त्वाची जीवनकौशल्ये आणि तंत्रकौशल्ये आत्मसात करावी लागणार आहेत. ज्यामुळे तुमचा पुढील कार्यकाळ सुखद आणि आशादायी होण्यास मदत होणार आहे. आपली अंगभूत कौशल्ये, आत्मविश्वास आणि सृजनशीलतेच्या बळावर जगातील जवळजवळ सर्व देशांत शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी प्रशंसनीय कामगिरी करीत आहेत. विद्यापीठाच्या लौकिकात आपणही मोलाची भर घालणार आहात, याची मला खात्री आहे. तुमच्या पुढे असलेल्या आव्हानांना तुम्ही समर्थपणे सामोरे जाल, असा मला विश्वास आहे. तुमच्या भावी वाटचालीस मी या प्रसंगी मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

जय हिंद! जय महाराष्ट्र!!

□□□



प्रकाशक : कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४.

मुद्रक : अधीक्षक, शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर-४१६ ००४